## मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
### प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन, २७०,भाबुर्डां ,सेनापती बापट मार्ग ,पुणे -१६
संकेतस्थळ : www.smart-mh.org , दूरध्वनी ०२०-२५६५६५७७/२५६५६५७८

जा.क्र. स्मार्ट /पी.सी.एम.यु./प्र.अ.क./संपादण/११० /२०२२-२३ दिनांक -१९ /०१ /२३

प्रती,
प्रमुख प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - (सर्व),
स्मार्ट प्रकल्प

विषय :- स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्रकल्प ,विभाग व जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्तरावर तसेच समुदाय आधारित संस्था स्तरावर करण्यात येणा-या संपादन प्रक्रियांच्या पूर्व मान्यतेचे (Prior Review) अधिकारात वाढ करण्याबाबत

संदर्भ:- १) स्मार्ट/पी.सी.एम.यु./सीबीओ/संपादण /१२७१ /२०२२ दि.२९ /०८ /२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
२) स्मार्ट/पी.सी.एम.यु./पीआययू /संपादण /१२९३ /२०२२ दि. ०१/०९/२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना
३) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क/संपादण /१३४२ /२०२२ दि. १२/०९/२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना
४) स्मार्ट/पी.सी.एम.यु./प्र.अ.क/संपादण /४७ /२०२२-२३ दि. ११/०१/२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचना

१) मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट ) प्रकल्पांतर्गत प्रकल्प ,विभाग व जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्तरावर विविध बाबींसाठी संपादन करावे लागते तसेच समुदाय आधारित संस्थेच्या (CBO) मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प राबविताना विविध वस्तू, बांधकामे, सल्लागार सेवा इत्यादीचे संपादन संदर्भ क्र. १ व २ या मार्गदर्शक सूचनांनुसार करणे बंधनकारक आहे.

२) संदर्भ क्र ४ नुसार संपादन प्रक्रिया राबविताना संपादन प्रक्रियेच्या निविदा दस्तऐवज , तांत्रिक मूल्यमापन अहवाल व आर्थिक मूल्यमापन अहवाल,कार्यादेश/पुरवठा आदेश तसेच कराराच्या मसुद्यास अशा प्रत्येक टप्यावर खालील कार्यालयाची संपादन प्रक्रीये करिता पूर्व मान्यता (Prior Review) घेणे आवश्यक आहे.

**अ) अमलबजावणी कक्ष स्तरावरील संपादन प्रक्रीये बाबत :**

| अ क्र | पूर्व मान्यतेचे अधिकार | नवीन मर्यादा |
|---|---|---|
| १ | जिल्हा अमलबजावणी कक्ष | रु ४० लाखा पर्यंत |
| २ | विभागीय अमलबजावणी कक्ष | रु. ४० लाखाच्या पुढे ते रु.१०० लाख पर्यन्त |
| ३ | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष | रु. १०० लाखाच्या पुढे ते रु.१५० लाख पर्यन्त |
| ४ | प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष | रु १५० लाखाच्या पुढील |

**आ) समुदाय आधारित संस्था स्तरावरील संपादनाप्रक्रीये बाबत:**

| अ क्र | पूर्व मान्यतेचे अधिकार | नवीन मर्यादा |
|---|---|---|
| १ | समुदाय आधारित संस्था संपादन समिती | रु १० लाखाच्या पर्यंत |
| २ | जिल्हा अमलबजावणी कक्ष | रु १० लाखाच्या पुढे ते रु ४० लाख पर्यंत |
| ३ | विभागीय अमलबजावणी कक्ष | रु. ४० लाखा पुढे ते रु.१०० लाख पर्यन्त |
| ४ | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष | रु. १०० लाखाच्या पुढे ते रु.१५० लाख पर्यन्त |
| ५ | प्रकल्प समन्वयन व व्यवस्थापन कक्ष | रु १५० लाखाच्या पुढील |

३) दि. १२/१/२३ रोजी सर्व PIU,RIU,DIU यांच्या प्रकल्प आढावा बैठकीत संपादन प्रक्रियेच्या पूर्व मान्यतेसाठी संदर्भ क्र. ४ नुसार प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचना ह्या जिल्ह्यातील सर्व स्मार्ट प्रकल्प अंमलबजावणी कक्षास (AGRI, MAVIM, MSRLM, AHD, VSTF, MCDC इतर) लागू आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे जिल्हा व विभागीय स्तरावर कार्यालयीन तसेच समुदाय आधारित संस्था स्तरावर होणाऱ्या संपादन प्रक्रियेच्या पूर्व मान्यते करिता संपादन समिती मध्ये बदल करण्यात येत आहेत.

| अ क्र | अंमलबजावणी कक्ष | स्वीकृती प्राधिकारी | संपादन / मुल्यांकन समिती |
|---|---|---|---|
| १अ | विभागीय अमलबजावणी कक्ष<br>**कार्यालयीन संपादन प्रक्रीये बाबत** | विभागीय कृषि सहसंचालक / वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेनुसार सक्षम अधिकारी | १) विभागीय नोडल अधिकारी (स्मार्ट)- अध्यक्ष<br>२) विभागीय संपादन अधिकारी – सदस्य सचिव<br>३) सनियंत्रण, मूल्यमापन व MIS तज्ञ -सदस्य<br>४) लेखा / वित्त अधिकारी/लेखापाल - सदस्य<br>५) संबंधित विशेषज्ञ/अधिकारी (आवश्यकतेनुसार)- सदस्य |
| १ ब | विभागीय अमलबजावणी कक्ष<br>**CBO स्तरावरील संपादन प्रक्रिये बाबतच्या पूर्व मान्यता** | विभागीय कृषि सहसंचालक / वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेनुसार सक्षम अधिकारी | १) विभागीय नोडल अधिकारी (स्मार्ट)- अध्यक्ष<br>२) विभागीय संपादन अधिकारी – सदस्य सचिव<br>३) पुरवठा साखळी व मूल्य साखळी तज्ञ -सदस्य<br>४) लेखा / वित्त अधिकारी/लेखापाल - सदस्य<br>५) सहायक अभियंता - सदस्य |
| २ अ | जिल्हा अमलबजावणी कक्ष-<br>**कार्यालयीन संपादन प्रक्रीये बाबत** | प्रकल्प संचालक, आत्मा / वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेनुसार सक्षम अधिकारी | १) जिल्हा नोडल अधिकारी (स्मार्ट) – अध्यक्ष<br>२) पुरवठा साखळी व मूल्य साखळी तज्ञ तथा कृषि व्यवसाय सल्लागार –सदस्य सचिव<br>३) लेखापाल- सदस्य<br>४) संबंधित विशेषज्ञ/अधिकारी (आवश्यकतेनुसार)- सदस्य |
| २ ब | जिल्हा अमलबजावणी कक्ष-<br>**CBO स्तरावरील संपादन प्रक्रिये बाबतच्या पूर्व मान्यता** | प्रकल्प संचालक, आत्मा / वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेनुसार सक्षम अधिकारी | १) जिल्हा नोडल अधिकारी (स्मार्ट) – अध्यक्ष<br>२) विभागीय संपादन अधिकारी –सदस्य सचिव<br>३) सहायक अभियंता –सदस्य<br>४) लेखापाल- सदस्य<br>५) संबंधित इतर प्र.अ.क.( MAVIM, MSRLM, AHD, VSTF, MCDC इतर) यांच्या प्रस्तावाकरीता यांचे जिल्हास्तरीय प्रतिनिधी -सदस्य |

४) अ.क्र. १ (अ) व २ (अ) च्या कार्यालयामार्फत करण्यात येणाऱ्या संपादन बाबींची संपादन प्रक्रिया करण्याकरिता प्रकल्प अंमलबजवणी कक्ष-कृषि ने वरील प्रमाणे व इतर प्रकल्प अंमलबजवणी कक्ष (MAVIM, MSRLM, AHD, VSTF, MCDC इतर) यांनी त्यांच्या स्तरावर जिल्हा व विभाग स्तरावर संपादन समिती गठीत करून संदर्भ क्र. २ व ४ नुसार संपादन प्रक्रिया करण्यात यावी.

(कौस्तुभ दिवेगावकर भा.प्र.से.)
प्रकल्प संचालक ,स्मार्ट